www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 160 वार सोमवार दि. 24 फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## शाडू माती १ मार्चपासून उपलब्ध

**‘पीओपी’ बंदीच्या अंमलबजावणीकरिता पालिकेचा निर्धार**

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई** : न्यायालयाचे आदेश आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने कंबर कसली असून गणेशोत्सव पर्यावरणस्नेही व्हावा यासाठी मूर्तिकारांना मागतील तेवढी शाडूची माती उपलब्ध करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. महापालिकेच्या सात परिमंडळांना तूर्तास प्रत्येकी १०० टन शाडूची माती उपलब्ध करण्यात येणार असून मूर्तिकारांना १ मार्चपासून मागणीनुसार शाडूची माती देण्यास सुरुवात करण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थितीत मूर्तिकारांना शाडूची माती कमी पडू द्यायची नाही, असा निर्धार महापालिकेने केला आहे. मुंबई महापालिकेने उच्च न्यायालयाचे आदेश आणि ‘सीपीसीबी’ची मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन मुंबईतील गणेशोत्सव पर्यावरणस्नेही व्हावा या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने विनामूल्य शाडूची माती उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या सात परिमंडळांना विभागस्तरावर निविदा मागवून शाडूची माती घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तूर्तास प्रत्येक परिमंडळाला १०० टन शाडूची माती उपलब्ध करण्यात येईल. मात्र मागणी वाढल्यास आणखी शाडूची माती खरेदी करून मूर्तिकारांना देण्यात येणार आहे, असे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले



पीओपीसंदर्भातील उच्च न्यायालयाचे आदेश आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत असून मूर्तिकारांना विनामूल्य शाडूची माती उपलब्ध करण्यात येत आहे. मूर्तिकारांच्या मागणीनुसार त्यांना १ मार्चपासून शाडूची माती देण्यात येईल. –प्रशांत सकपाळे, उपायुक्त

====================

## शक्तिकांत दास पंतप्रधानांच्या सचिवपदी

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**नवी दिल्ली** : रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांची पंतप्रधानांचे प्रधान सचिव (दोन) म्हणून नियुक्ती करण्यात आली. भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी पी.के.मिश्रा हे सध्या पंतप्रधानांचे मुख्य सचिव म्हणून काम पाहात आहेत. दास हे तमिळनाडू केडरचे भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी असून, पंतप्रधानांच्या कार्यकाळापर्यंत किंवा नव्याने आदेश जारी होईपर्यंत ते या पदावर असतील. मंत्रिमंडळाच्या समितीने दास यांच्या नियुक्तीला मान्यता दिली. दास यांनी ४२ वर्षांच्या प्रशासकीय सेवेतील कारकीर्दीत प्रामुख्याने अर्थ, कर, गुंतवणूक तसेच पायाभूत सुविधा क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

===============

## कुंभमेळयात ६० कोटी भाविकांचे स्नान

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**प्रयागराज** : उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभामध्ये आतापर्यंत ६० कोटी भाविकांनी स्नान केल्याचा दावा उत्तर प्रदेश सरकारने शनिवारी केला. कुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केल्यास मोक्ष मिळतो अशी अनेक भाविकांची समजूत आहे. मकरसंक्रांतीच्या आदल्या दिवशी, १३ जानेवारीला सुरू झालेला हा महाकुंभ बुधवारी, २६ फेब्रुवारीला समाप्त होणार आहे.

### भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या संकल्पनेतून सुरु झालेल्या 'युवा उमेद'

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड** -: भोकर विधानसभा मतदारसंघाच्या उपक्रमांतर्गत आज शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि. नांदेड येथे राज्यमंत्री.सौ. मेघनाताई साकोरे-बोर्डीकर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महिला व बाल विकास विभाग यांच्या हस्ते भव्य रोजगार मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी. पी. सावंत,भारतीय जनता पक्षाचे नांदेड ग्रामीण उत्तरचे अध्यक्ष किशोर देशमुख,नांदेड महानगर कार्यकारी अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, नांदेड महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




दैनिक युवक आधार - आष्टी पोलीस स्टेशन तालुका परतुर येथे दैनिक युवक आधार दिनदर्शिका 2025 वितरण करताना मराठवाडा विभागीय संपादक प्राचार्य जगन्नाथ रासवे यांनी माननीय जमादार शेळके साहेब व त्यांच्या स्टॉपला दिनदर्शिका वितरण केली.

## सोने जीएसटीसह ८९,१९८, तर चांदीने गाठला एक लाखाचा आकडा !




नागपूर - गेल्या आठवड्यात नागपुरात ३ टक्के जीएसटीसह दहा ग्रॅम शुद्ध सोन्याचे भाव ८९,१९८ रुपये आणि किलो चांदीची किंमत एक लाख रुपयांवर पोहोचली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडी, औद्योगिक क्षेत्राकडून चांदीला वाढती मागणी आणि लोकांची सोन्यात गुंतवणूक वाढल्यामुळे दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमतीत वाढ झाल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. बाजार बंद होताना शनिवार, २२ रोजी दहा ग्रॅम शुद्ध सोने जीएसटीविना ८६,६०० रुपये आणि चांदीचे दर ९७,२०० रुपयांवर स्थिरावले. ३ टक्के जीएसटी अर्थात २,५९८ रुपयांच्या वाढीसह नागपुरात सराफांकडे सोन्याचे भाव ८९,१९८ रुपये आणि चांदीवर २,९१६ रुपये जीएसट आकारून किलो चांदीची १,००,११६ रुपये भावाने विक्री झाली. दोन्ही मौल्यवान धातूंचे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहेत. गेल्या आठवड्यात जीएसटीविना सोने १,५०० आणि चांदीचे भाव ७०० रुपयांनी वाढले. शनिवार, १५ फेब्रुवारीच्या तुलनेत सोमवार, १७ रोजी सोन्याच्या भावात ४०० रुपयांची वाढ झाली. मंगळवार, १८ रोजी ६०० रुपये, बुधवार, १९ रोजी ७०० रुपयांची वाढ होऊन भावपातळी ८६,८०० रुपयांवर गेली. गुरुवार, २० रोजी भाव स्थिर होते. मात्र, शुक्रवार, २१ रोजी सोने ५०० रुपयांनी घसरले. शनिवार बाजार बंद होताना भाव ३०० रुपयांची वाढून जीएसटीविना ८६,६०० रुपयांवर पोहोचले.

## ..चिकुंदा येथे शिवजन्मोत्सव निमित्त होम मिनिस्टर कार्यक्रमाचे प्रथम क्रमांक सौ.मंजुश्री गायकवाड..

**दैनिक युवक आधार --**
**संतोष पुदाले**

**तुळजापूर धाराशिव** चिकुंदा येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने दि.२२ फेब्रुवारी रोजी महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रम प्रा.संतोष पवार सर यांच्या हस्ते घेण्यात आला या कार्यक्रमाचे प्रथम क्रमांक सौ.मंजुश्री लिंबराज गायकवाड तर द्वितीय क्रमांक सौ.सारिता (गरड) गायकवाड मॅडम तृतीय क्रमांक सौ.धनश्री.सहदेव गरड चतुर्थ क्रमांक सौ.रोहिणी कृष्णात सजें हे विजेते ठरली आहे या कार्यक्रम मध्ये अनेक महिला सहभाग झालेल्या सर्व स्पर्धकांचे समितीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले या कार्यक्रमाचे बक्षीस वितरण चिकुंदा गावचे तालीम संघाचे वस्ताद पै.वामन दादा गरड यांच्या वतीने देण्यात आला तसेच होम मिनिस्टर कार्यक्रम घेतल्या बद्दल प्रा.संतोष पवार यांचे सत्कार मंडळाचे अध्यक्ष विजय दादा गरड व उपाध्यक्ष निरंजन भैया गरड यांच्या हस्ते करण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे सदस्य प्रा.संजय मोटे शंकर मोटे शाहूराज गायकवाड महादेव जाधव उमेश मोटे ज्ञानेश्वर मोटे सहदेव गरड हा कार्यक्रम यशस्वी केले बद्दल सर्व कार्यकर्त्याचे आभार शिवसेना उद्बाव



बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे शाखाप्रमुख संतोष मोटे यांनी सर्वांचे आभार मानले

## पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जन्मशताब्दी निमित्त पनवेल मध्ये विशेष कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्रप्रतिनिधी/प्रदीप पाटील**

राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री ना.श्री.एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना.श्री.अजितजी पवार यांच्या कृपाशीर्वादाने, जलसंपदा तथा पालकमंत्री ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील आणि ना.श्री.राम शिंदे यांच्या सहकार्याने,सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ना.श्री.आशिष शेलार यांच्या सौजन्याने सांस्कृतिक कार्यविभाग , सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने मंगळवार दि.25 फेब्रुवारी2025 रोजी रात्रो 8:30 वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडकेनाट्यगृह पनवेल येथे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जन्मशताब्दी निमित्त पनवेल मध्ये विशेष कार्यक्रम विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



लोहपुरुषाची शौर्यगाथा”असे या कार्यक्रमाचे नाव असून नृत्य,नाट्य,आणि संगीतमय असा कार्यक्रम असून याची प्रस्तुती “दत्ता भोईर” यांच्या फ्रेंड्स सामाजिक कलामंच भेंडखळ-उरणयांच्या वतीने सादरीकरण करण्यात येणार आहे. “लोहपुरुषाची शौर्यगाथा”याकार्यक्रमाचे लेखन-दिग्दर्शन: विजय कांबळे यांचे असून संगीत:महेंद्र मांजरेकर यांनी दिले आहे तर नृत्यदिग्दर्शन:सौ. शमिका जाधव यांनी केले असून या साठी विशेष सहकार्य देव ॲक्टींग अॅड मॉडेलींग अकॅडमी पनवेल यांनी केले आहे. सदरचा कार्यक्रम सांस्कृतिक कार्यविभाग , सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने मंगळवार दि.25 फेब्रुवारी2025 रोजी रात्रो 8:30 सादर करण्यात येणार या कार्यक्रमासाठी सर्वांना प्रवेश विनामूल्य असेल या कार्यक्रमास सर्व नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान, सांस्कृतिक कार्यविभागाचे अप्पर मुख्यसचिव श्री. विकास खारगे(भा.पर.से.)व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्री विभीषण चवरे महाराष्ट्र शासन यांनी केले आहे.

## १२,९५१ विद्यार्थ्यांनी केले प्रवेश निश्चित; शिक्षण होणार सुकर

**यंदा लवकर सुरू झाली आरटीई प्रवेश प्रक्रिया**

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई** : शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील आरटीई प्रवेश प्रक्रियेत यंदा १ लाख ९,१११ जागांसाठी तब्बल ३ लाख ५,८२८ अर्ज आले आहेत. मुंबईमधील २५५ शाळांमध्ये ४,६८५ जागांसाठी १३,१६६ अर्ज आले आहेत. प्रवेश प्रक्रियेची सोडत १० फेब्रुवारीला जाहीर झाल्यानंतर राज्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेंतर्गत निवड झालेल्या १२,९५१ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. पहिल्यांदाच आरटीई प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू करण्याचा निर्णय घेतला. आरटीई प्रवेश प्रक्रियेत आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये मोफत प्रवेश घेता येतो. यंदा राज्यभरातील ८,८६३ शाळांमध्ये प्रवेशासाठी १ लाख ९,१११ जागा उपलब्ध झाल्या आहेत.

प्रक्रियेसाठी अर्ज भरण्यासाठी १४ ते २७ जानेवारीची पहिली मुदत, तर २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी अशी दुसरी मुदत दिली होती.

**जुलैपर्यंत प्रक्रिया होणार पूर्ण; संधी वाढणार**

यंदा प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू झाल्यामुळे जून-जुलैपर्यंत आरटीई प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश आरटीईद्वारे होणार नाहीत, त्यांना अन्य शाळांमध्ये प्रवेश घेण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे जून-जुलैपूर्वीच प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे आव्हान शिक्षण विभागासमोर राहणार आहे.

## पोदार जम्बो किड्स पनवेल यांचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

दैनिक युवक आधार

सुरेश भोईर (कार्यकारी संपादक ) पोदार जम्बो किड्स दरवर्षीप्रमाणे यावर्षीही स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम स्वंम्पा मोहिते यांच्या वतीने दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी अनुष्का बल्ला व स्वंम्पा मोहिते यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन व राष्ट्रगीतांनी मंगलमय सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये प्ले ग्रुप ते सीनियर के जी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी विद्यार्थ्यांनी आपली कला व सादरीकरण यशस्वीपणे सादर केली.या वेळी पालक वर्गातून वंदना जयस्वाल, वृद्धी जगे यांनीही नृत्य सादरीकरण केले व शिक्षकांनी ही या कार्यक्रमात सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शन राघव पोदार यांनी केले व सूत्रसंचालन सभा कच्ची आणि दिपाली पाटील यांनी केले.या कार्यक्रमांमध्ये अश्विनी त्रिमाले.शिक्षक,पालक वर्गांनी विद्यार्थ्यांना टाळ्या वाजवून प्रोत्साहित करून आनंद लुटला व या वेळी पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.












## अखिल आगरी समाजाच्या उरण तालुका अध्यक्षपदी सीमा घरत

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

राजकीय पटलावरील मान्यवरांच्या उपस्थितीत अखिल आगरी समाजा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास समाजातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थितीत होते, यावेळी अखिल आगरी समाजाच्या उरण तालुका अध्यक्षपदी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या सौ. सीमा अनंत घरत यांची निवड करण्यात आली.यावेळी त्यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. अध्यक्षपदावर सौ. सीमा घरत यांची निवडहोताच उरण तालुक्यांतील आगरी महिलांमध्ये आनंदाचे वातावरण असून सीमाताईंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सौ. सीमा घरत या सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिल्या असून त्यांनी समाज्यांतील अनेक समस्यां मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी आवाज उठविला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आज संपन्न झालेल्या अखिल आगरी समाजाच्या कार्यक्रमात उरण तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी सौ. सीमा अनंत घरत यांच्यावर सोपविण्यात आली असून त्यांना नियुक्तीपत्र ही देण्यात आले आहे. सौ. सीमा घरत सर्व लढ्यामध्ये नेहमी सक्रीय सहभागी होत असल्याने . त्याची दखल समाजाने घेऊन त्यांना दि.बा. पाटील योद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर




पुरस्कार वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी आमदार रविशेठ पाटील, आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार संजीव नाईक, अखिल आगरी समाजाचे अध्यक्ष दशरथ पाटील, अतुल पाटील व इतरमान्यवर उपस्थित होते. अखिल आगरी समाजाच्या उरण तालुका अध्यक्षपदी व दि.बा. पाटील योद्धा पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ. सीमा अनंत घरत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मुलाशी अश्लील चाळे, वॉर्डबॉयला केली अटक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल**

: कामोठेतील एका सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील वॉर्डबॉयने एका १८ वर्षीय अल्पवयीन मुलासोबत अश्लील चाळे केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील २७ वर्षीय वॉर्ड बॉयविरोधात पॉक्सोसह लैंगिक चाळे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या प्रकरणातील पीडित मुलगा पनवेलमध्ये राहण्यास आहे. गत गुरुवारी तो आईला कामोठे येथील एका खासगी सुपरस्पेशालिटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यास आला होता. रात्रीच्या वेळी आपल्या आईची देखभाल करण्यासाठी तो रुग्णालयामध्ये थांबला होता. सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगा झोपेला होता. वॉर्ड बॉयने ही संधी साधत मुलाचे कपडे काढून त्याच्यासोबत अश्लील व लैंगिक चाळे केले. या प्रकारानंतर जाग आल्यानंतर त्याने वॉर्ड बॉयला विरोध केला. त्यानंतर त्याने आपल्या आई-वडिलांना सर्व माहिती कळवल्यानंतर कामोठे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार या प्रकरणातील वॉर्ड बॉयविरोधात पॉक्सोसह लैंगिक चाळे केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी दिली.

# भारतीयत्वाचा धागा जुळल्यास परिवार आनंदी

## ‘मनमोकळा संवाद-मराठीचा अमराठी संसार’ परिसंवादात उमटले सूर

**राकेश मोरे/नवी दिल्ली**

माणसाची जडण-घडण, भाषा, संस्कृती भिन्न असली, तरी माणूस आतून एकच असतो. प्रेम कधीही, कुठेही होऊ शकते, त्याला कशाचाच अडसर नसतो. समान भारतीय धागा जुळल्यानंतर प्रांत आणि भाषेचा अडथळा ओलांडून संसार आणि परिवार आनंदी होतो. भाषेचा सातत्याने व सतर्कतेने वापर झाल्यास ती आपोआप आत्मसाद होते आणि तिचे संस्कार रुजत जातात, असा सूर ‘मनमोकळा संवाद-मराठीचा अमराठी संसार’ या परिसंवादात उमटला.



अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे सरहद, पुणे-दिल्ली आयोजित ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात या आगळ्यावेगळ्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण सभागृहातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मंचावर या दिलखुलास मनमोकळ्या गप्पा शनिवारी रंगल्या.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे - डॉ. साधना शंकर, राजदीप सरदेसाई- सागरिका घोष, रेखा रायकर- मनोजकुमार, डॉ. मंजिरी वैद्य- प्रसन्ना अय्यर यांचा यात सहभाग होता. अस्मिता पांडे आणि बाळ कुलकर्णी यांनी त्यांना प्रश्न विचारून बोलते केले. यावेळी आमदार डॉ. विश्वजित कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजदीप सरदेसाई यांनी आपल्या मिश्किल शैलीत पत्नी सागरिका घोष यांच्याबरोबर झालेल्या पहिल्या भेटीची आठवण सांगत ओळख करून दिली. माझ्या लिखाणाचे पहिले समीक्षण सागरिकाच करते, याचा कौतुकाने उल्लेख केला. पत्नीला क्रिकेटमधले फारसे ज्ञान नसले, तरी माझ्या सासुबाई मात्र क्रिकेटच्या चाहत्या असल्याने त्यांच्याशी माझी चांगली गट्टी जमली, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. सागरिका घोष यांनी राजदीप यांच्या कामाचे कौतुक करत आमच्या घरात बंगाल आणि महाराष्ट्र यांचे द्वंद्व सुरूच असते, असे सांगितले. राजदीप सरदेसाई यांच्यासारखा पत्रकार पूर्ण भारतात सापडणार नाही हे नुसती पत्नीच नव्हे तर पत्रकार म्हणून माझे ठाम मत आहे. बातमी ही जणू माझी सवतच आहे. नवरा-बायकोच्या सहजीवनामध्ये बायकोने कधी कधी ऐकूच आले नाही, अशी भूमिका घेतल्यास संसार आनंदी होतो या सासूबाईंच्या सल्ल्याने मी संसार यशाच्या मार्गावर नेला, असेही त्या म्हणाल्या.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

साधना उत्तम कलाकार आणि लेखिका आहे. माझी ओढ अजूनही गावच्या मातीत रुजलेली आहेत. तर साधना उच्च शिक्षण घेतलेल्या शहरी वातावरणात वाढलेली आहे. तरीही ती आवडीने खेड्यात रमते, असे सांगून डॉ. ज्ञानेश्वर मुळे म्हणाले की, माझ्या फक्त मराठी बोलणाऱ्या आईशी तिचे अनुबंध जुळले होते. नोकरीच्या निमित्ताने देश-परदेशात वास्तव्य असल्याने आमची मुले बहुभाषिक बनली आहेत. डॉ. साधना शंकर म्हणाल्या की, ज्ञानेश्वर यांचा भक्कम पाठिंबा आमच्या संसाराला लाभला आहे. आमचे नाते म्हणजे माझ्या बाजूने ‘लव्ह ॲण्ड हेट’ तर त्यांच्याकडून ‘टॉलरेट’ असे असल्याचे त्यांनी मिश्किलपणे सांगितले.

### बहुभाषिकत्व आत्मसाद

महाराष्ट्राच्या सीमारेषा ओलांडल्या की आपली इतर संस्कृतींशी ओळख होत जाते. पती मनोज यांचा मराठी नसूनही ‘लाथ मारेन तेथे पाणी काढेन’ हा मराठी बाणा मला विशेष भावला, असे रेखा रायकर म्हणाल्या. लहान वयातच विविध भाषांचे संवादरूप संस्कार झाल्यास बहुभाषिकत्व आत्मसात होते. लग्नानंतर काही प्रमाणात तडजोडी करताना पतीची भक्कम साथ लाभल्यास स्त्रीला बदल स्वीकारणे सुकर जाते. मनोजकुमार म्हणाले, रेखा ही उत्तम पत्नी, कुटुंबात रमणारी असून तिच्या हाताला उत्तम चव आहे. भाषा, संस्कृती याचा प्रत्येक व्यक्तीला अभिमान असणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हे कौतुकास्पद आहे. मराठी बोलता येत नसले तरी मला मराठी चित्रपट आणि नाट्यकृती पहायला मनापासून आवडते, असेही त्यांनी विशेषत्वाने सांगितले.

### बहुभाषिक असल्यामुळे विविध संस्कृतीचा मिलाफ

डॉ. मंजिरी वैद्य म्हणाल्या की, माझे पती प्रसन्ना अय्यर माझ्यातील कलाकाराचा उत्तम सांभाळ करतात. भाषेबद्दल बोलताना त्या म्हणाल्या, मुलांचे संगोपन करताना भाषाभेद न ठेवता योग्य वयात मुलांवर भाषेच उत्तम संस्कार केल्यास ते बहुभाषिक बनतात. प्रसन्ना अय्यर यावेळी म्हणाले की, बहुभाषिक असल्यामुळे व्यक्तीमध्ये विविध संस्कृतीचा मिलाफ होतो. मंजिरीचे गाणे पहिल्यांदा ऐकले तेव्हाच मी तिच्या प्रेमात पडलो. मी तमीळ आहे. असे असले तरी माझी जडण-घडण महाराष्ट्रातच झाल्याने थोडाफार फरक वगळता आमच्यावर फारसे भिन्न संस्कार झालेले नाहीत. त्यामुळे आमचे सूर सहजतेने जुळले, असे प्रसन्ना अय्यर यावेळी म्हणाले. दरम्यान मोठ्या संख्येने प्रेक्षक वर्ग या कार्यक्रमाला शनिवारी उपस्थित होता.

## कवी कट्टा म्हणजे साहित्याचे ऊर्जा केंद्र

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन

९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी महात्मा ज्योतिराव फुले सभामंडपात "कवी कट्ट्याचे" उद्घाटन महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी कवी कट्ट्याचा दहा वर्षांचा प्रवास उलगडून दाखवला आणि मराठी साहित्याच्या संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कवी कट्टा म्हणजे साहित्याचे ऊर्जा केंद्र असल्याचे नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

राजन लाखे व गोपाळ कांबळे यांनी समन्वयाची जबाबदारी पार पाडली. प्रारंभी राजन लाखे यांच्या प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी मराठी भाषा संचालनालयाचे संचालक डॉ. शामकांत देवरे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाहक ॲड. प्रमोद अदरकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष रवींद्र शोभणे उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि मराठी साहित्याच्या वाढीसाठी कवी कट्ट्याच्या उपक्रमाचे कौतुक केले.



उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपल्या भाषणात कवी कट्ट्याचा वर्षांचा प्रवास, मराठी भाषा, साहित्य, आणि मराठीला अभिजात दर्जा मिळण्याच्या संघर्षाचा उल्लेख केला. त्या म्हणाल्या, “कवी कट्ट्याच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे दरवर्षी मंडपाचा आकार वाढवत न्यावा लागतो, ही अत्यंत आनंदाची बाब आहे, असे त्या म्हणाल्या.

## कौशल्यातून मराठी पाऊल नक्कीच पुढे

### ‘मराठी पाऊल पडते पुढे’ या चर्चासत्रातील सूर

संकल्पना, मनुष्यबळ, कौशल्य, झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, एकमेकांना सोबत घेऊन जाण्याची निती, योग्य शिक्षण या सगळ्यांची योग्य मोट बांधली तर राज्याची नव्हे तर देशाची अर्थव्यवस्था ट्रिलीयन इकॉनामीपर्यंत नक्की पोहोचेल, असा विश्वास ‘मराठी पाऊल पडते पुढे’ या परिसंवादात तज्ज्ञांनी व्यक्त केला.

दिल्ली येथील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिला सत्रात ‘मराठी पाऊल पडते पुढे’ या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात पत्रकार पराग करंदीकर, ‘केपीआयटी’चे प्रमुख रवी पंडित, ‘बीव्हीजी ग्रुप’चे प्रमुख हणमंतराव गायकवाड सहभागी झाले होते. त्यांच्याशी पत्रकार, निवेदक प्रसन्न जोशी यांनी संवाद साधला. यशवंतराव चव्हाण सभामंडपातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व्यासपीठावर या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी पाऊल पडते पुढे याचा अन्वयार्थ काय, त्याचे पडसाद कोणकोणत्या क्षेत्रात पडत आहेत, याविषयी जाणून घेण्यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

सेवा, शिक्षण आणि अन्य उद्योग क्षेत्रात जेव्हा जेव्हा मराठी पाऊल पुढे पडते तेव्हा तेव्हा त्याची दखल साहित्याच्या माध्यमातून घेण्यात येते. सरस्वतीची उपासना करून लक्ष्मीला प्रसन्न करता येते हे गेल्या पन्नास वर्षांत मराठी माणसाला उमगले आहे. आता मराठी माणसाला व्यवसाय करणे गैर वाटत नाही. व्यवसायात



असलेली ‘रिस्क’ घेण्यासाठी आपली मानसिकता तयार झालेली आहे, असे पराग करंदीकर म्हणाले.

हणमंतराव गायकवाड म्हणाले की, उद्योग क्षेत्रात भरारी घेताना आपल्या कामात गुणवत्ता राखली पाहिजे. त्यात सर्वोत्कृष्टपणा आणला पाहिजे. कोणत्याही कामाची लाज न बाळगता ते काम सर्वोत्कृष्ट पद्धतीने केले पाहिजे. जगात संधी आहेत; संधींचा शोध घेतला पाहिजे. मराठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. वास्को-द-गामासारख्या खलाशाकडून शोधाची गरज आणि धाडस यासाठी प्रेरणा घेणे गरजेचे आहे.

स्टार्टअप इकोसिस्टीम, स्टार्टअप नेशन या संकल्पनांबाबत माहिती देताना रवी पंडित म्हणाले की, कोणतेही काम करताना भावना, महत्त्वाकांक्षा, जिद्द महत्त्वाची ठरते. आपले व्यक्तिमत्व हे आपल्या शब्दांपेक्षा अधिक बोलते. जीवनात काहीतरी भव्य दिव्य करण्याची जिद्द ठेवली पाहिजे. आराम हराम आहे, कष्टाच्या मागे धावले पाहिजे, म्हणजे यश मिळतेच.

### कार्यक्रमाला भावनिक किनार

बीव्हीजीचे प्रमुख हणमंतराव गायकवाड यांच्या मातोश्री मराठी भाषेच्या शिक्षिका होत्या. त्यांचे नुकतेच निधन झाले आहे. असे असताना त्यांना आदरांजली म्हणून गायकवाड साहित्य संमेलनात सहभागी झाले.



भारती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजीराव कदम यांनी दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील मुंबई मराठी पत्रकार संघाच्या प्रदर्शन कक्षाला भेट दिली. त्याप्रसंगी पत्रकार संघाचे सचिव शैलेंद्र शिर्के, प्रा. हेमंत सुधाकर सामंत आणि राजेंद्र साळसकर हे उपस्थित होते.

## मुंबई विमानतळाजवळील हॉटेलला भीषण आग

### ७० ते ८० जणांना सुरक्षित बाहेर काढले

**मुंबई :** मुंबई विमानतळाजवळील फेअरमोंट हॉटेलला आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. अग्निशमन दलाच्या १५ पेक्षा अधिक गाड्या घटनास्थळावर दाखल झाल्या होत्या. उशिरापर्यंत या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी हॉटेलमधील ७० ते ८० जणांना सुरक्षित बाहेर काढले. एसी कॉम्प्रेसर फुटल्यामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील फेअरमोंट हॉटेल्स या पंचतारांकित हॉटेलला आग लागली. घटनेची माहिती मिळताच सहार पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. उशिरापर्यंत या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू होते.

### एसी कॉम्प्रेसर फुटल्याचा प्राथमिक अंदाज

हॉटेलच्या किचनमधून धूर आल्याचे काही कर्मचाऱ्यांनी पाहिले. फेअरमोंट हॉटेल्सच्या टेरेसवरील एसी कॉम्प्रेसर फुटल्यामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. काही वेळातच आग हॉटेलच्या इतर भागातही पसरली. अग्निशमन दलाच्या जवानांनी हॉटेलमधील ७० ते ८० जणांना सुरक्षित बाहेर काढले. अग्निशमन दलाच्या १५ गाड्या घटनास्थळी दाखल होत्या.

## कोस्टल रोडवरील तडे बुजवण्याचे काम नव्याने सुरू

### पालिकेचा आदेश, कंत्राटदारांची पळापळ



**मुंबई :** मुंबईची वाहतूककोंडी फोडण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या कोस्टल रोडवर पडलेले तडे, भेगा बुजवण्याचे काम नव्याने सुरू करण्यात आले आहे. शुक्रवारी रात्रीपासून तडे-भेगा बुजवण्याचे काम हाती घेण्यात आले असून पालिकेच्या आदेशानंतर कंत्राटदारांची पळापळ झाली आहे. दरम्यान, तांत्रिक कारणामुळे भेगा पडल्याचे पालिकेचे स्पष्टीकरण फोल ठरले आहे.

मुंबई शहर व उपनगरातील वाहतूककोंडी फोडण्यासाठी कोस्टल रोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरला असला तरी कोस्टल रोडचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे समोर आले आहे. १४ हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या कोस्टल रोडवर तडे व भेगा पडल्याचे वृत्त जाहीर होताच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीवर टीकेची झोड उठली. युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनीही निकृष्ट दर्जाच्या कामावर बोट ठेवत पालिकेसह महायुतीवर टीकास्त्र सोडले. चहुबाजूंनी टीका होत असल्याने पालिका प्रशासनाची धावपळ उडाली आणि तांत्रिक कारणामुळे भेगा, तडे गेल्याचे पालिका प्रशासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आले. मात्र शुक्रवार रात्रीपासून तडे, भेगा बुजवण्याचे काम कंत्राटदारांनी हाती घेतले आहे.

### दोन दिवसांत काम फत्ते होणार!

कोस्टल रोड आता पूर्ण क्षमतेने सुरु झाल्यामुळे दररोज हजारो वाहने या मार्गावरून जात आहेत. त्यामुळे रस्त्यावर पडलेले तडे, भेगा बुजवण्याचे काम रात्रीच्या वेळी करण्यात येत आहे. यामध्ये खराब झालेला संपूर्ण भाग काढून टाकला जात असून नव्याने बनवण्याचे काम सुरु करण्यात आले असून दोन दिवसांत डांबरीकरणाचे काम पूर्ण केले जाईल, असे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## मध्य रेल्वेतर्फे होळी विशेष २८ ट्रेन

**मुंबई :** मध्य रेल्वेने होळीच्या सणादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई - नागपूर / मडगाव / नांदेड आणि पुणे - नागपूर दरम्यान २८ होळी विशेष ट्रेन चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्यांचे आरक्षण २४ फेब्रुवारी रोजी सुरू होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस द्वि-साप्ताहिक विशेष गाडीच्या ८ सेवा चालविण्यात येणार आहे. ट्रेन क्रमांक ०२१३९ ही द्वि-साप्ताहिक विशेष ट्रेन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ९, ११, १६ आणि १८ मार्च रोजी रात्री १२.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी दुपारी ३ वाजून १० मिनिटांनी पोहोचेल.

ट्रेन क्रमांक ०२१४० ही द्वि-साप्ताहिक विशेष ट्रेन नागपूर येथून ९, ११, १६ आणि १८ रोजी रात्री ८ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-मडगाव-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडीच्या ४ सेवा चालविण्यात येणार आहेत.

### कुंभमेळासाठी ८२३ ट्रेन सेवा चालवल्या

महाकुंभ मेळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ८ जानेवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत मध्य रेल्वेने तब्बल ८२३ ट्रेन सेवा चालवल्या आहेत. यामुळे लाखो भाविकांना कुंभमेळ्यामध्ये सहभागी होता आले.

**धुळीच्या साम्राज्याने नागरिक त्रस्त; खड्ड्यांत मातीचा भराव**

## आरे परिसरातील काँक्रीटीकरण केलेल्या रस्त्यावर पुन्हा खोदले खड्डे



**मुंबई :** प्रदूषणमुक्त मुंबईची स्वप्ने पाहणाऱ्या मुंबई महापालिकेचा आरे विभागात अजब कारभार सुरू आहे. आरे मार्गावरील मॉडर्न बेकरी बस थांबा ते आरे रुग्णालय या परिसरातील रस्त्याचे काँक्रीटीकरण सुरू आहे. मात्र, काही भागात काँक्रीटीकरण केलेल्या रस्त्यावर पुन्हा खड्डे खोदण्यात आले आहेत. खोदलेल्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आल्यावर या खड्ड्यांत मातीचा भराव टाकण्यात आला आहे. परिणामी येथे धुळीचे साम्राज्य सर्वत्र पसरले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणारे प्रवासी, नागरिक त्रस्त झाले आहेत.

पावसाळ्यापूर्वी मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचे काम पालिका प्रशासनाकडून सुरू आहे. मात्र, काँक्रीटीकरण केलेल्या रस्त्यांवरील काही भागात पुन्हा खोदकाम केले जात आहे. आरे मार्गावर मॉडर्न बेकरी बस थांबा ते आरे रुग्णालय या भागात काही दिवसांपूर्वी सुमारे आठ ते दहा खड्डे खोदण्यात आले आहेत, असे सामाजिक कार्यकर्ते गॉडफ्रे पिमेंटा यांनी सांगितले. त्यामुळे रस्त्यावर अनेक ठिकाणी रस्ता रोधक (बॅरीकेट्स) उभे करण्यात आले होते. त्याचा वाहनांना अडथळा निर्माण होत होता. आता हे खड्डे बुझविण्यासाठी मातीचा वापर करण्यात येत असून वाऱ्यामुळे माती आसपासच्या परिसरात पसरत आहे. तसेच परिसरात वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. सकाळी आणि सायंकाळी रस्त्यावर होणाऱ्या वाहतूककोंडीमुळे नोकरदारांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित रस्त्याच्या काँक्रीटीकरणाला एक वर्षही पूर्ण झालेले नाही.

रस्ता सुस्थितीत असतानाही त्यावर सातत्याने खोदकाम केले जात असल्याचे तेथील स्थानिक रहिवाशांनी सांगितले. काही महिन्यांपूर्वी आरे दूध वसाहतीतील काँक्रीटीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांवरही पुन्हा खोदकाम करण्यात आले होते. रस्त्यांच्या मधोमध उभ्या रेषेत खोदकाम केल्यामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत होते. दरम्यान या मार्गावरील हे खड्डे कायमस्वरूपी भरण्यात यावेत अशी मागणी जोर धरत आहे.

**संपर्क साधला; मात्र पालिका अधिकाऱ्यांचा प्रतिसाद नाही**

### रहिवाशी संतप्त

काँक्रीटीकरण केल्यानंतर रस्त्यावर तडे कसे जातात, असा सवाल रहिवाशांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, मुंबईकरांना रुंद, खड्डेमुक्त आणि दर्जेदार रस्त्यांच्या माध्यमातून वेगवान प्रवासाची अनुभूती मिळावी, यासाठी पालिका प्रशासनाने मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. काही महिन्यांपूर्वी आरेमधील रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाल्यामुळे संबंधित भागातील रहिवाशांना दिलासा मिळाला होता. मात्र, पुन्हा काँक्रीटीकरण झालेल्या रस्त्यांवर खोदकाम करण्यात आल्यामुळे रहिवासी संतप्त झाले आहेत. दरम्यान याबाबत पालिका अधिकाऱ्यांची भूमिका जाणून घेण्यासाठी संपर्क साधला असता समोरून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

युवक आधार


# सिल्लोड येथे राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-योगेश पालोदकर**
**सिल्लोड:**




- स्वतःच्या कृतीतून स्वच्छतेचा संदेश देणारे,अशिक्षित असूनही वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे व त्याचा प्रचार-प्रसार करणारे,दिवसा गावातील घाण साफ करणारे आणि संध्याकाळी भजन व किर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या मनातील उच्च-निचतेची,अंधश्रद्धेची, असमानतेची घाण साफ करणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती सिल्लोड येथे संत गाडगेबाबा चौकात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती कार्यक्रमावेळी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी भाजपा अल्पसंख्याक मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, नगरसेवक मनोज मोरेल्लु,राजु शिरसाठ, शामराव आळने

# उदगीर - लातुर राज्यमार्गा वरिल येरोळमोड येथे प्रवाशी निवारा नसल्याने प्रवाशी ऊन्हात ताटकळत...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**
**शिरूरआनंतपाळ :लातूर**



**उदगीर -** लातुर या मार्गावरील उदगीर ते लातुर येथून ग्रामिण भागात जाणाऱ्या येरोळमोड येथील बस प्रवाशांना बसथांबा नसल्याने भर उन्हात ताटकळत थांबण्याची वेळ आली आहे. येरोळमोड येथुन येरोळ, साकोळ, तळेगाव, शेंद, दैठणा, पांढरवाडी, सुमठाणा, कबणसांगवी, आंबेगाव, उजळंब येथील जेष्ट नागरिक, शालेय विद्यार्थी, व्यापारी शेतकरी दररोज उदगीर ते लातुर येथे विविध कामासाठी येरोळमोड येथुन जात असतात परंतु येरोळमोड येथे प्रवाशी निवारा नसल्याने प्रवाशांना उन्हातान्हात ताटकळत थांबावे लागत आहे. विशेषत येरोळ, कबणसांगवी, उजळंब, आंबेवाडी आदी भागातील प्रवासी नोकरी, व्यवसायासह इतर विविध कामांसाठी शहरात जात असतात. याबरोबरच बसने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील अधिक आहे. त्यामुळे प्रवाशांची सतत ये-जा असते. मात्र, बसथांबा नसल्याने प्रवाशांना ऐन उन्हाळ्यात ऊन्हापासून बचाव करण्यासाठी इतरत्र उभे रहावे लागत आहे. येरोळमोड या परिसरातून दररोज मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वर्दळ असते. त्यामुळे बसथांब्याजवळ प्रवाशांची गर्दी दिसून येते. परिसरात पाणी पिण्याची देखील कोणतीही सोय उपलब्ध नाही. प्रवाशी निवारा नसल्याने प्रवाशांना वाढत्या उन्हाचा सामना करावा लागत आहे. सकाळी व सायंकाळी प्रवाशांची संख्या अधिक असते. दरम्यान, प्रवासी बसच्या प्रतिक्षेत भररस्यात थांबतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. फेब्रुवारीमध्येच उन्हाच्या झळादेखील वाढू लागल्याने प्रवाशांना बसथांब्यावर थांबणे असह्य होत आहे. विशेषतः लहान मुले, महिला व वयोवृद्ध प्रवाशांना नाहक त्रास करावा लागत आहे. या ठिकाणी निवारा उभारावा, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे संत गाडगेबाबा यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड(प्रतिनिधी) :**

**रणजीत सिंह ठाकुर-** दिनांक 23 फेब्रुवारी 2024 रोजी महान राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्वप्रथम श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देशमुख यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्रचार्य संजय नरवाडे हेही उपस्थित होते. आपले विचार व्यक्त करताना प्राचार्य संजय देशमुख म्हणाले की गाडगे महाराज म्हणजे एक चालते बोलते विद्यापीठ होय. आजूबाजूची स्वच्छता करताना मानवी मनाची स्वच्छता ही होणे आवश्यक आहे हे जाणून आपल्या प्रबोधनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे गाडगे महाराज कुठेही आपले प्रबोधन असेल तर त्या ठिकाणी गेल्यानंतर सर्वप्रथम आपला खराटा हातात घेऊन आजूबाजूचा सर्व परिसर स्वच्छ करून त्यानंतर तेथील जनतेच्या मनामध्ये असणाऱ्या अनिष्ट रूढी कशा समूळ नष्ट करता येतील याचा उपदेश गाडगेबाबा आपल्या प्रबोधनातून करत होते. आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती शिकली तर आपले कुटुंब कशाप्रकारे सक्षम होईल हे आपल्या प्रबोधनातून पटवून सांगत. देव दगडात नाही तर तो माणसात आहे, त्यामुळे माणसाची सेवा हीच खऱ्या अर्थाने देवाची सेवा होय हे ते नेहमी सांगत असे प्राचार्य देशमुख यांनी सांगितले. यावेळी उपप्राचार्य संजय नरवाडे यांचेही समयोचीत भाषण झाले. या कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक विजय देशमुख यांनी केले.




# म्हसावद थेपडे विद्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती उत्साहात साजरी




**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील**

जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे स्वा सै पं ध थेपडे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद येथे आज रोजी थोर समाज सुधारक राष्ट्रसंत गाडगेबाबा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य श्री पी डी चौधरी सर यांनी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती हूजरे मॅडम, सौ श्रुती पाटील मॅडम, श्री एन ए पाटील सर, श्री निलेश पवार सर तसेच वस्तीगृहातील विद्यार्थी उपस्थित होते.

# १०८ वा दासनवमी महोत्सव संपन्न



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल : पनवेल येथील पुरा**तन रामदास (मारुती) मंदिरामधे सुरू झालेल्या दासनवमी उत्सवाची सांगता झाली. यानिमित्त ह. भ. प. समीरबुवा ओझे यांचे कीर्तन संपन्न झाले. त्याना चंद्रकांत मने यानी संवादिनी व शार्दूल डोंगरे यांनी तबलासाथ केली. मंदिराच्या या सोहळ्याचे हे १०८ वे वर्ष होते. या निमित्ताने गेले दहा दिवस गायन, नाटिका, भजन, भारुड, कीर्तने, व्याख्याने व दासबोध वाचन असे विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. या सर्व सोहळ्याची सांगता महाप्रसादाने झाली.

मंदिराचे विश्वस्त चंद्रशेखर खरे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले, हा सोहळा प्रतिवर्षी आयोजित केला जातो. यामधे स्थानिक तसेच राज्यभरातील अनेक नामवंत कलाकार आपली सेवा मनोभावे सादर करतात. या मंदिरात हनुमान जयंती, तुकाराम बीज, नाथषष्ठी, संत ज्ञानेश्वर संजीवनसोहळा, परशुराम जयंती, शंकराचार्य जयंती, आदी उत्सवही भक्तिभावात संपन्न होत असल्याची माहिती खरे यानी दिली.

# थकबाकीदारांच्या मालमत्तांची अटकावणी

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**पनवेल :** पनवेल महापालिकेच्या करसंकलन व कर आकारणी विभागाने मालमत्ता कर न भरणाऱ्या थकीत मालमत्ताधारकांवर कारवाईस सुरुवात केली आहे. यामध्ये कारखाने, हॉटेल, लॉज आदींची अटकावनी करण्यास सुरुवात केली आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेप्रमाणे थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटिसानंतर सात दिवस दिवसांचा कालावधी पूर्ण होऊनसुद्धा मालमत्ताकर न भरलेल्यांना, वॉरंट नोटिसा देऊनही अटकावणी व जप्ती कारवाईस सुरुवात केली आहे. आतापर्यंत विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटिसा व २७ वॉरंट नोटिसांचे वाटप केल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहे. आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना मालमत्ताकर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतु, आता महापालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. उपायुक्त स्वरूप खारगे व करअधीक्षक महेश गायकवाड तसेच कर अधीक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात येत आहे.

# शिवजयंती दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात 'ड्राय डे' जाहिर करावा केतन भोज यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**



**मुंबई,(प्रतिनिधी);** दरवर्षी आपण आपल्या संपूर्ण महाराष्ट्रात १९ फेब्रुवारी रोजी आपल्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आपण सर्व शिवभक्त साजरी करत असतो.यावेळी सर्व महिला - पुरुष, लहान - थोर शिवभक्त आपण सर्वजण आपल्या महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी एकत्र येत,सहभागी होत असतो.या शिवजयंती दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात 'ड्राय डे' जाहिर करून संपूर्ण महाराष्ट्रात मद्यविक्रीची दुकाने यादिवशी संपूर्णतः बंद ठेवण्यात यावी. अशी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांची मागणी आहे.तसेच महात्मा गांधी जयंतीला दरवर्षी 'ड्राय डे' असतो,तर आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि आदर्शांचा सन्मान करण्यासाठी शिवजयंती दिवशी सरकारने ड्राय डे जाहिर करावा. याशिवाय आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सोहळ्यात आपल्या भगिनी,लहान थोर हे सहभागी होत असल्याने कुठेही आपल्या महाराजांच्या जयंतीला गालबोट लागून नये तथा कोणताही अनुचित प्रकार कुठेही घडू नये. याशिवाय शिवजयंती दिवशी मद्य विक्रीची दुकाने सुरू राहणे हे चित्र आपल्या महाराष्ट्रात शिवजयंती दिवशी तरी दिसणे हे आपल्या महाराजांच्या विचारांना तसेच आपल्या सर्वांना ही अशोभनीय असेच आहे.तरी शिवजयंती दिवशी सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात 'ड्राय डे' जाहिर करावा,अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# मुंबईत सलग दुसऱ्या दिवशी तापमान ३७ अंशांवर

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई :** ऋतुबदलाच्या काळात सध्या किमान आणि कमाल तापमानाचा पारा वाढत असून मुंबईचा पारा सलग दुसऱ्या दिवशी ३७ अंशांपार पोहोचला. सांताक्रूझ येथे शनिवारी ३७.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, पुढील काही दिवस तापमान चढेच राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मुंबईत शनिवारी सांताक्रूझ येथे ३७.२ अंश सेल्सिअस, तर कुलाबा येथे ३५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथील तापमान सरासरीपेक्षा ५.२ अंशांनी अधिक नोंदले गेले. मात्र, याआधी फेब्रुवारीमध्ये कमाल तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसपारही पोहोचला आहे. दिवसभर उकाडा आणि दुपारी उन्हाचा चटका यामुळे दुपारी घराबाहेर फिरणाऱ्या मुंबईकरांना शनिवारी वातावरणातील बदलांचा अधिक त्रास सहन करावा लागला. कमाल तापमानाबरोबरच किमान तापमानातही मागील दोन दिवसांपासून वाढ होत आहे. यामुळे पहाटेचा जाणवणारा गारवा आता नाहीसा झाला आहे. मुंबईबरोबरच रत्नागिरी, ठाणे या भागातही तापमानाचा पारा चढा होता. रत्नागिरी येथे ३८.४ अंश सेल्सिअस, तर ठाणे येथे ३७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

**पालघर सर्वाधिक उष्ण**

पालघर येथे शनिवारी राज्यातील सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली. येथे कमाल तापमान ४०.३ अंश सेल्सिअस नोंदले गेले. त्याखालोखाल सोलापूर, परभणी, जळगाव या भागातही तापमानाचा पारा चढा होता. दरम्यान, राज्यात किमान आणि कमाल तापमानात वाढ होत ही वाढ पुढील काही दिवस कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे



**दैनिक युवक आधार -** पनवेल लाईफ केअर असोसिएशन नवीन पनवेल यांच्या तर्फे आदिवासी मुलांना कपडे दप्तर खाऊ वाटप पनवेल तालुक्यातील करबेळी भल्याचीवाडी यलमाळ मोरबे आदिवासी वाडी मुलांना दप्तर खाऊ कपडे साड्या वाटण्यात आले होते यावेळी अध्यक्षा सौ सविता सवाई सेक्रेटरी एकनाथ चिरले जितेंद्र नाळे अशोक सांगले हेमंत खिरे स्वाती सोरटे विनोद पाचघरे शंकर पाटील सामाजिक कार्यकर्ते रविंद्र पाटील बापु चौधरी किरण भगत आदि उपस्थित होते

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भव्य उद्योजकता कार्यक्रम – "मी उद्योजक होणारच"

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )**

मराठी भाषा गौरव दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी कुसुमाग्रज (विष्णू वामन शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि तिच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेले योगदान अभूतपूर्व आहे. मराठी भाषा केवळ साहित्यापुरती मर्यादित न ठेवता ती उद्योग, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही आपली जागा निर्माण करत आहे. आजच्या युगात मराठी माणूस केवळ नोकरीच्या मागे न धावता स्वतःचा व्यवसाय सुरू करून आर्थिक स्वातंत्र्य मिळवू शकतो. उद्योजकतेला चालना देण्यासाठी आणि मराठी तरुणांनी व्यवसाय क्षेत्रात मोठी भरारी घ्यावी, यासाठी "मी उद्योजक होणारच" या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (BSE), मुंबई येथे मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ ते रात्री ९ या वेळेत होणार आहे. यामध्ये यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन: कार्यक्रमात विविध क्षेत्रातील नामांकित उद्योजक, स्टार्टअप फाउंडर्स आणि गुंतवणूकदार (इन्क्युबेटर्स) उपस्थित राहून मराठी तरुणांना मार्गदर्शन करतील. स्टार्टअप संधी आणि व्यवसाय वृद्धी: नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या माहितीवर चर्चा होईल. नेटवर्किंग संधी: नवोदित आणि अनुभवी उद्योजकांना परस्पर सहकार्याची आणि व्यवसाय वृद्धीच्या संधी मिळतील.फंडिंग आणि गुंतवणूक: नवीन स्टार्टअपसाठी आर्थिक मदतीच्या संधी आणि गुंतवणूकदारांशी थेट संवाद साधण्याची संधी.

**मराठी तरुणांनी उद्योग क्षेत्रात उतरण्याची गरज का आहे?**

आज भारतात स्टार्टअप इकोसिस्टम वेगाने वाढत आहे. परंतु मराठी तरुण अजूनही नोकरीच्या सुरक्षिततेकडे जास्त कल दाखवत आहे. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून माहिती तंत्रज्ञान, कृषीउद्योग, उत्पादन क्षेत्र, सेवा उद्योग, ई-कॉमर्स, अन्न प्रक्रिया उद्योग, निर्यात-आयात व्यवसाय आणि डिजिटल मार्केटिंग यासारख्या क्षेत्रांत मराठी तरुणांनी मोठ्या प्रमाणावर संधी घेतल्या पाहिजेत.

**"मी उद्योजक होणारच" कार्यक्रमात सहभागी व्हा!**

या कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उदय सामंत, आशिष शेलार, मंगल प्रभात लोढा, शंभूराज देसाई, नितेश राणे तसेच इतर नामवंत उद्योजक उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. पत्रकारितेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विनायक पात्रुडकर यांना जीवनगौरव तसेच प्रसाद लाड यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच अजित गोरुले (अध्यक्ष - कुणबी उद्योजक लॉबी )यांचाही गौरव करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम मराठी तरुणांनी आपल्या उद्योजकीय प्रवासाला सुरुवात करण्यासाठी आणि उद्योग क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सुवर्णसंधी ठरणार आहे.सदर कार्यक्रम विनामूल्य असून महाराष्ट्र कल्चर क्लब हा त्याचा माध्यम प्रयोजक आहे. कार्यक्रमाचे आयोजक निलेश मोरे, संतोष पाटील, उदय सावंत, जीवन भोसले असून कार्यक्रमात सहभागीसाठी ७४००११९४३६ / ९८१९८४३१४८ या नंबरवर संपर्क करा. किंवा या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी खालील लिंक ओपन करून आपला फॉर्म भरा.

https://forms.gle/Kw9aJJitHHZrX6QD7

व्हाट्सअप ग्रुप जॉईन करण्यासाठी:
व्हाट्सअप ग्रुप लिंक : https://chat.whatsapp.com/BcS4yzcIkQjFBn4pW8mEAq

"उद्योजकतेकडे वळा,स्वावलंबी बना आणि मराठी भाषा तसेच महाराष्ट्राचा अभिमान वाढवा!"

# प्रा.आमदार. राजूभाऊ तोडसाम यांचा आदिवासी समाजाच्या वतिने भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**




**घाटंजी -** दिनांक 22 फेब्रुवारी 2025 रोजी आर्णी केळापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रा.श्री.राजूभाऊ तोडसाम यांचे समस्त आदिवासी समाज संघटनां कडून रसिकाश्रय घाटंजी येथे सत्कार व समाजप्रबोधन, स्नेहमिलन सोहळा ऑल इंडीया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन, आदिवासी जेष्ठ नागरिक संगठन, आदिवासी परधान समाज संघटना, कोयापुणेम गोटुल संगठन ,जय जंगो जय लिंगो महीला विकास संस्था,आदिवासी विकास परीषद यांचे तर्फे आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री होमदेव किनाके (अध्यक्ष आदिवासी जेष्ठ नागरिक संगठन) तर उद्घाटक म्हणून श्री प्रविण मडावी,(जिल्हा कार्याध्यक्ष ऑल ईं आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन यवतमाळ) तर प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी संघटनांचे पदाधिकारी किसन किनाके,विनोद आडे शरद सोयाम, मारोतराव मडावी, उत्तमराव कोवे, अंबादास मडावी,के.डी. मडावी, रामकृष्ण कोडापे, सज्जनभाऊ कमरे, अविनाश पेंदोर,मारोतराव पुसनाके, सौ.अर्चनाताई तोडसाम, सौ संध्याताई मरापे,सौ प्राचीताई सिडाम,सौ.सिंधूताई सिडाम,सौ पुष्पाताई पेंदोर,मंगलाताई धुर्वे हे उपस्थित होते. समाजाच्या वतिने आमदार प्रा.श्री.राजूभाऊ तोडसाम यांचे सपत्नीक सत्कार करण्यात आला.सोबतच समाजातीसमाजप्रबोधन व व्यावसायिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे, समाजबांधवांचा गौरव करण्यात आला. मा. आमदार राजू तोडसाम यांनी समाजाला मार्गदर्शन करताना,भविष्याचा वेध घ्या. पारंपारिकता सोबत आधुनिकता यांची सांगड घालून शैक्षणिक, व्यावसायिक,सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करा. गुणवत्तापुर्ण शिक्षणाचा कास धरा. एकजुट व एकोपा असाच कायम ठेवा .काळाची गरज ओळखून एकसंघ रहा असे बहुमोल मार्गदर्शन करून, उपस्थितीतांचे मन जिंकून घेतले.

क्षी प्रविण मडावी यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात आमदार साहेबांच्या कार्याचा उल्लेख करून भाऊ रुपाने आपण विकास पुरुषाचा सत्कार करीत असून राजूभाऊच्या नेतृत्वाखाली समाजाचा विकास निश्चित होईल असा विश्वास व्यक्त केला. सोबतच कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. अध्यक्षीय भाषणात क्षी होमदेव किनाके यांनी आमदार साहेबांच्या विविध कार्याचा उल्लेख करून,समाज नेहमी राजूभाऊ आपल्या पाठीशी उभा राहिला आहे आणि राहील याची ग्वाही देतो , आपण व्यक्त केलेल्या भावनेप्रमाणे समाजाला एकसंघ व संघटित ठेवण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करू याची ग्वाही दिली.

**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.आरती पुसणाके तर आभार श्री हनुमान कुमरे यांनी मानले.**

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश मरापे, रमेश कन्नाके,पुंडलिक आत्राम, विलास चिकराम,डि डि पुसनाके,अंकुश सलाम भास्कर वेट्टी वसंत सिडाम, नागोराव मेश्राम , बंडुभाऊ तोडसाम, विष्णू कनाके, मारोती कनाके,धर्मवीर मडावी, गजानन मडावी,गजानन तोडसाम,सुदाम पेंदोर ,वासुदेव केराम,क्रिष्णा मडावी,अमोल गेडाम, देवजी मसराम, काशिनाथ भादिकर,मयुर मंगाम, संदीप गेडाम, डॉ.मसराम, माधव मरापे ,निमसटकर सर,निळकंठ परचाके,जनार्दन मरस्कोले, क्षिराम तोडसाम,,संजय तोडसाम, गुलाब तोडसाम,पप्पू तोडसाम, बुद्धाराम दडांजे, माधव मरापे, रामेश्वर कुमरे,प्रविण वेट्टि गिरिधर मडावी, मोरेश्वर गेडाम ,कलिराम वेट्टी,विलास मडावी, सुरज वेट्टि, सुलोचना तोडसाम सुचिता मसराम, अर्चना मरस्कोल्हे, सरिता सलाम, सविता सलाम, मनिषा मसराम,शालु गेडाम,संध्या तोडसाम,गिता कुडमथे,रजनी गेडाम,गिता ऊर्वते, सुनिता शेडमाके,प्रिया प्रत्येकी,सुमन मंगाम,कुळसंगेताई,कोरवते ताई, प्रीती आरके, प्रीती पेंदाम यांनी परीक्षम ...

# राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे कार्य व विचार युवा पिढीने अंगीकारणे ही काळाची गरज-गुणवंत एच.मिसलवाड

**दैनिक युवक आधार**



**नांदेड -** वयाच्या 35 व्या वर्षापासून ते 80 व्या वर्षापर्यंत म्हणजेच आखरी श्वासापर्यंत राष्ट्रसंत गाडगेबाबांनी स्वच्छतेचे महत्व, विज्ञानवादी विचार आपल्या किर्तनाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करून मानव कल्याणासाठी मनोभावे कार्य केले, अशा या थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचे कार्य व विचार आधुनिक काळात युवा पिढीने सोशल मिडीयात न भरकटता कार्य व विचार अंगीकारून कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन एस.टी. मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.23 फेब्रुवारी रविवार रोजी सकाळी ठिक 10.30 वाजता चालते-बोलते विद्यापीठ, स्वच्छता चळवळीचे प्रणेते, विज्ञानवादी किर्तनकार, थोर राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा (डेबूजी झिंगराजी जानोरकर) यांची 149 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती सोहळा अभिवादन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. सर्वप्रथम बसस्थानक प्रमुख मा.श्री.यासीन हमीद खान यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी आपल्या मानवतावादी व विज्ञानवादी किर्तनाद्वारे अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, भोळ्या समजुती, अनिष्ठ रूढी परंपरा इत्यादी दूर करणे व जनतेमध्ये जागरूकता निर्माण करून दशसुत्री कार्यक्रम राबवून तेरा धर्मशाळा बांधल्या. अशा या महान व्यक्तीमत्व विभूतीचा आपण सर्वांनीच आदर्श घेवून समाजाप्रती-देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते शेवटी यावेळी म्हणाले.याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून बसस्थानक प्रमुख यासीन हामीद खान, वाहतुक नियंत्रक राजेश धनजकर, आनंदा कंधारे, एस.टी. मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, वरिष्ठ लिपीक गोविंद तेलंग, सौ.शिल्पा ढवळे, वैशाली कोकणे, वाहक धनंजय बनभैरू, एस.बी.दाढाळे, चालक बेगाजी बोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रा.प.म.आगारातील कामगार-कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# येवता येथील वनपरिक्षेत्र व पर्यटन स्थळाला आग

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

तालुक्यातील येवता येथील वनीकरण विभाग वनपरिक्षेत्र पर्यटन स्थळाला आग लागून या आगीमध्ये लाखो रुपयाचे नुकसान झाल्याची घटना दिनांक 23 फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजताच्या दरम्यान घडली. या घटनेमध्ये परिसरातली मौल्यवान झाडेझुडपे मोठी झाडे तथा गवत जळून खाक झाले आहे. आगीचे कारण मात्र अद्याप कळू शकले नाही. याबाबत माहिती अशी की दिनांक 23 फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजताच्या दरम्यान येवता येतील वनपरिक्षेत्र पर्यटन विभाग परिसरात आगीचे धूर दिसून येताच स्थानिक नागरिकांनी त्या ठिकाणी धाव घेतली. यादरम्यान स्थानिक नागरिक तथा समाजसेवक नितीन लोखंडे यांनी याबाबतची माहिती रिसोड नगरपरिषद अग्निशमन दल विभागाला दिली. नगर परिषद अग्निशमन दलचे कर्मचारी वाहक अझरुद्दीन तथा गजू पवार यांनी अग्निशमन वाहनासह घटनास्थळी पोहोचून पसरत असलेली आग विझवली यामुळे सदर आग ही शेतकऱ्यांच्या पिकाकडे गेली नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होण्यापासून वाचले असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. सदर आग लागली तेव्हा सुखदेव नवघरे, शुभम भांदुर्गे, गणेश अंभोरे, आदींनी झाडाच्या फांद्या तोडून आग विझवण्याच्या प्रयत्न केला मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. अग्निशमन विभागाने सदर आग आटोक्यात आणली मात्र होणाऱ्या नुकसानापासून वाचवू शकले नसले तरी मात्र एक मोठा अनर्थ टळला असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. आग कशी लागली याबाबत मात्र माहिती मिळू शकली नाही.



## एकनाथ हिरक आरोग्यवर्ष अंतर्गत
## शिवसेना प्रभाग क्रमांक १२३ च्या वतीने शिवधर्म सेवा संघ व वेदांत हॉस्पिटल आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज);** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त एकनाथ हिरक आरोग्यवर्ष अंतर्गत शिवसेना प्रभाग क्रमांक १२३च्या माजी नगरसेविका डॉ.भारती सुबोध बावदाने व शिवसेना विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने आयोजित शिवधर्म सेवा संघ व वेदांत हॉस्पिटल यांच्या वतीने खंडोबा टेकडी याठिकाणी मोफत रक्त तपासणी,आरोग्य तपासणी,हृदयरोग तपासणी,नेत्र तपासणी व मोफत औषध उपचार तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा विभागातील स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला.यावेळी हे शिबिर यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी कठोर परिश्रम घेतले.तसेच शिवधर्म सेवा संघ व वेदांत हॉस्पिटल यांच्याही सर्व वरिष्ठ डॉक्टर व त्यांच्या टिमचे या शिबिराला मोलाचे सहकार्य लाभले असून आयोजक डॉ.भारती बावदाने व डॉ.सुबोध बावदाने यांनी सर्व डॉक्टर व त्यांच्या टिमचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.



## ऋतुराज वसंत - या राज्यस्तरीय आठव्या अद्याक्षर मुक्त कविता लेखन स्पर्धेचा निकाल जाहीर!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर** –भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था मुंबई" या संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे वसंत ऋतूत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय आठव्या मराठी भाषा ऋतुराज वसंत मुक्त अद्याक्षर कविता लेखन स्पर्धेचे (फेब्रुवारी 2025) नुकतेच आयोजन केले होते. ऑनलाइन स्वरुपात झालेल्या या काव्यलेखन स्पर्धेत अनेकानेक कवींनी सहभाग नोंदवला. कमीत कमी शब्दांत आशयघन व प्रेरणादायी शब्दरचना याशिवाय लेखनातील रचनावृत्त, शब्दलयता इत्यादी व अद्याक्षर रचना इत्यादी निकष यासाठी निश्चित केले होते.

यामध्ये राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रीमती सुचेता सावंत ( दादर ) यांना द्वितीय क्रमांक विभागून सौ. रिया लोटलीकर (बोरिवली ,मुंबई ), सौ. अन्वया काणे (विलेपार्ले ) व सौ. रंजना शिंदे (मुंबई) यांना तृतीय क्रमांक विभागून सौ. वंदना माईन ( अंधेरी ), पुनम पतंगे (पनवेल ), सौ वसुंधरा मराठे (ठाणे), कु. इक्षिता फडके ( विलेपार्ले) यांना तर उत्तेजनार्थ कु. विनय सरदेसाई ( रत्नागिरी ) आणि सौ. सुजाता फडके ( विलेपार्ले ) यांना मिळाला.

सर्व विजेत्या कविवर्यांना संस्थेच्या परिवारातर्फे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. भारतीय वैदिक विज्ञान संशोधन संस्था मुंबई संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.आनंदसर व संस्था संबंधित मराठी भाषा व समिक्षा क्षेत्रातील विविध अभ्यासक,यांचे यासोबतच काव्य स्पर्धेच्या संयोजिका सौ.सुजाता आंबेरकर, व श्री शिवपद्म वडाळकर, स्पर्धा संयोजक श्री संदेश कदम यांचे यामध्ये योगदान लाभले.

# घरकुल योजनेतील १७ हजार ९७५ लाभार्थ्यांना मंजुरी पत्र प्रदान

## पहिला हप्ता वितरण कार्यक्रमात लाभार्थ्यांना आनंदाश्रू अनावर



**ठाणे :** 'सर्वांसाठी घरे' या धोरणांतर्गत 'प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२' अंतर्गत दि. २२ फेब्रुवारी रोजी केंद्रीय गृहमंत्री, भारत सरकार अमित शहा व मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते राज्यातील २० लाख लाभार्थींना मंजुरी पत्र वितरण, १० लाख लाभार्थ्यांना एका क्लिकमध्ये पहिला हप्ता दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले.

त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत १८ हजार २४८ चे उद्दिष्ट असून यापैकी एकूण १७ हजार ९७५ घरकुल पात्र लाभार्थींना तालुकानिहाय मंजुरी पत्र प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हास्तरावर प्रातिनिधीक स्वरूपात १५ लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण करण्यात आले. त्याचबरोबर सर्व पात्र लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण करण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) पहिल्या टप्प्यातील घरकुलाचे काम उत्तम प्रकारे पूर्ण केलेल्या तीन लाभार्थ्यांना घरकुलाच्या चावीची प्रतिकृती देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी संतोष पांडे यांनी केले.

### जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

घरकुल नोंदणी, मंजुरी यासाठी ठाणे जिल्हा महाराष्ट्रात अग्रेसर आहे. ग्रामस्थांना स्वप्नातील घर पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटीबद्ध आहे. घर मिळवून देण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन तसेच जिल्हा परिषद मार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन ज्या पध्दतीने काम करीत आहे, त्यासाठी लाभार्थ्यांनी देखील घर बांधणी वेळेत पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी याप्रसंगी केले.

राज्यात ठाणे जिल्ह्यातील घरकुलांचे काम उत्तम प्रकारे केले आहे. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रम सुरू आहे आणि प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये मंजुरी पत्र वितरण कार्यक्रम सुरू आहे. प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे घर असणे महत्त्वाचे आहे. यामुळे लाभार्थ्यांनी दर्जेदार, उत्कृष्ट घरकुल तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच आवश्यक कागदपत्र उपलब्ध करून देण्यासाठी व मयत झालेल्या लाभार्थींच्या कुटुंबासाठी प्रशासनाने तसेच लाभार्थ्यांनी जोमाने काम करावे.
**- डॉ. विजय सुर्यवंशी,** आयुक्त कोकण विभागीय

घरकुल नोंदणी व मंजुरी करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी- कर्मचारी यांनी मिशन मोडवर केवळ ७ दिवसात कामकाज पूर्ण केले आहे, यासाठी त्यांनी विभागाचे कौतुक केले. तसेच लाभार्थ्यांनी त्यांना मंजूर झालेली घरे लवकरात लवकर पूर्ण करावीत.
**- रोहन घुगे,** मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद

स्वप्नातील घर पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ महत्त्वाची योजना असून आज मला मंजुरी पत्र व पहिला हप्ता देण्यात आला, ही माझ्या कुटुंबियांसाठी आनंदाची बाब आहे.
**- अर्चना यशवंत पतंगराव,** अंबरनाथ तालुक्यातील लाभार्थी

माझे कुडाच्या घरात बालपण गेले आणि लग्नानंतर देखील कुडाच्या घरातच राहत होतो. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ अंतर्गत माझे स्वतःचे घर तयार झाले आहे, यासाठी मी प्रशासनाची आभारी आहे.
**- विद्या उत्तम पाटील,** भिवंडी तालुक्यातील लाभार्थी



# कशेडी घाटातील बोगदे मार्चमध्ये होणार खुले

## सार्वजनिक बांधकाममंत्र्यांनी दिली माहिती

**कराड :** देशाच्या सागरी पश्चिम किनारपट्टीवरील मुंबई-गोवा महामार्गाच्या पळस्पे ते हातखंबा या टप्प्यातील कशेडी घाटाच्या दोन्ही बोगद्यांतील वाहतूक येत्या मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचे नियोजित असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली.

या महामार्गाच्या विस्तारीकरण कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मंत्री भोसले गुरुवारी रात्री उशिरा या कामाच्या ठिकाणी आले होते. यावेळी त्यांनी खेड तालुक्यातील कशेडी बोगद्याची पाहणी केली. कशेडी बोगद्यातील काम पाहिल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला असता सदर येणाऱ्या व जाणाऱ्या दोन्ही बोगद्यांतील वाहतूक येत्या मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचे नियोजित असल्याची माहिती दिली.

मंत्री भोसले म्हणाले, मुंबई-गोवा महामार्गावरून पूर्ण क्षमतेने वाहतूक सुरू करण्यासाठी या महामार्गाचे अपूर्ण काम लवकरात लवकर व दर्जेदार व्हावे, यासाठी केंद्रीय बांधकाममंत्री नितीन गडकरी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बारकाईने लक्ष ठेवून आहेत. बोगद्याच्या काही भागात गळती लागली असून, याबाबत योग्य त्या उपाययोजना केल्या जातील,असे आश्वासन देत सद्यस्थितीत पहिल्या बोगद्यातून वाहतूक सुरू आहे. बोगद्याला जोडणारे दोन्ही बाजूकडील दुपदरी रस्ते जवळपास पूर्णत्वाला गेले असले तरी काही कामे अपूर्ण आहेत.

गणेशोत्सव कालावधीत दुसऱ्या बोगद्याची एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आली होती. मात्र, उत्सव कालावधीनंतर पुन्हा बंद करण्यात आली. यानंतर दिवाळी, वर्ष अखेर आणि नववर्षाच्या सुरुवातीला या दोन्ही बोगद्याची अपुरी कामे पूर्ण करून वाहतुकीला बोगदे सुरू होतील, असे वाटले होते. मात्र, ते पूर्ण झालेले नाही. त्यामुळे मंत्री भोसले यांनी या कामाची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

### गळतीचा कोणताही धोका नाही

दोन्ही बोगद्यांतील गळतीचा कोणताही धोका नाही, जुन्या बोगद्याला जिथे गळती होती ती काढण्यात आली आहे. काही ठिकाणी अजूनही गळती सुरू असून, त्यावर नवीन तंत्रज्ञान वापरून उपाययोजना केल्या जात आहेत. गळती थांबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. मात्र, या गळतीमुळे कोणताही धोका नसल्याचे मंत्री भोसले यांनी सांगितले.

## दीक्षांत समारंभ संपन्न



भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या प्रमुख उपस्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ वा दीक्षांत समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाला उपराष्ट्रपतींच्या सुविद्य पत्नी डॉ. सुदेश धनखड, राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन, खासदार डॉ. भागवत कराड, कुलगुरू डॉ. विजय फुलारी उपस्थित होते.

## आंगणेवाडीच्या यात्रेला उत्साहात सुरुवात

**रत्नागिरी :** लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या आई भराडी देवीच्या यात्रेला सुरुवात झाली असून पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे. नवसाला पावणारी भराडी देवी अशी या देवीची ख्याती आहे. यावेळी नऊ रांगांमध्ये भाविकांना सुलभ दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या भराडी देवीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात, त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण तालुक्यात आंगणेवाडीच्या भराडी देवीच्या होणाऱ्या यात्रेसाठी जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. शनिवारी दर्शन आणि ओटी भरणे कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. यात्रेसाठी मंत्री, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, सेलिब्रिटी मोठ्या संख्येने भेट देतात,त्यामुळे कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## उमरठच्या समाधीसाठी १० कोटी – भरत गोगावले



**पोलादपूर :** २०२२ च्या शौर्यदिन आणि पुण्यतिथी सोहळ्यात राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सवरून ५ कोटी मंजूर केल्यानंतर १० कोटी देण्याची घोषणा केली होती. आपण स्वतः लाडक्या बहिणीमुळे राज्याकडे पैशाचे शॉर्टेज असले तरी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत पाठपुरावा करू, अशी ग्वाही राज्याचे फलोत्पादन, रोहयो व खारलँड मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

रायगड जिल्हा परिषद, पोलादपूर पंचायत समिती आणि नरवीर तानाजी मालुसरे उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट, उमरठच्या संयुक्त विद्यमाने नरवीर तानाजी मालुसरे यांच्या ३५५ व्या शौर्यदिन व पुण्यतिथी सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून मंत्री गोगावले बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, गटविकास अधिकारी दिप्ती घाट, तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे, भाजप अध्यक्ष तुकाराम केसरकर, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नरवीरांचे १३वे वंशज रायबा मालुसरे, राजिप उपअभियंता नरेंद देशमुख, पोलादपूर गटशिक्षणाधिकारी संजय वसावे, राजिपचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी तसेच पोलादपूरच्या नगरसेविका अस्मिता पवार, शिल्पा दरेकर व स्नेहल मेहता आदी उपस्थित होते.

प्रारंभी मंत्री भरत गोगावले यांचा उत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्याहस्ते तर शिवमुद्रा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश कदम यांचा मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते नरवीर तानाजी मालुसरे २०२५ पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

## फुगा फेकण्याच्या वादातून मारहाण

**उल्हासनगर :** होळीचा सण रंगाचा असतो, उत्सवाचा असतो, पण यंदा तो शहरात तणावाचे सावट घेऊन आला आहे. एका किरकोळ वादाने इतके गंभीर रूप घेतले की, थेट दुकानात घुसून दोन व्यक्तींना अमानुष मारहाण करण्यात आली. पाण्याचा फुगा फेकला गेला, या कारणावरून सात ते आठ जणांच्या टोळक्याने भरदिवसा घडवलेल्या या हल्ल्यामुळे संपूर्ण परिसर हादरला असून, घटनेचा संपूर्ण थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

उल्हासनगर कॅम्प ५ मधील गणेशनगर येथे ही धक्कादायक घटना घडली. स्थानिक व्यावसायिक इरशाद अली यांच्या जीन्स फॅक्टरीसमोर काही तरुण मुले पाण्याचे फुगे फेकत होते. या प्रकारावरून वाद सुरू झाला, आणि काही वेळातच परिस्थिती चिघळली. अचानक सात ते आठ जणांचे टोळके दुकानात घुसले आणि इरशाद अली तसेच त्यांच्यासोबत असलेल्या अब्दुल हकीम यांना अमानुष मारहाण केली.

# विनाअडथळा लाभार्थ्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण करा

## पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रशासनाला सूचना



### स्वतःच्या हक्काचे घर असावे हे स्वप्न सत्यात

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राज्यात एकाच दिवशी दहा लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्रे व पहिला हप्ता जमा होत आहे. ही घरकुले येत्या १०० दिवसात पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद फुलेल, असे उद्गार वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी काढले. ही सर्व घरकुले पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. कागलमध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा – दोन अंतर्गत ५, ०३८ लाभार्थ्यांना मंजुरीपत्रे आणि डी. बी. टी. द्वारे पहिल्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमात मंत्री मुश्रीफ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कोल्हापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समिती –कागल यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**कोल्हापूर :** प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये २०१८ च्या सर्वेक्षणानुसार ७० हजार घरकुले मंजूर झाली आहेत. त्यापैकी २०२२-२३ मध्ये ४ हजार तर २०२४-२५ मध्ये ४१ हजार ६०० घरकुले मंजूर झाली आहेत. यातील ३८ हजार घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र तर २४ हजार सहाशे लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण राज्यस्तरावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे हस्ते करण्यात आले. या मंजूर घरकुलांची अंमलबजावणी करीत असताना आम्ही सोबती घरकुलाचे हा उद्देश समोर ठेवून घरकुल लाभार्थ्यांना विनाअडथळा दिलेल्या वेळेत आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करता येईल, यासाठी सर्व जिल्हा परिषद प्रशासनाने कार्य करावे, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या.

यावेळी पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'महा आवास अभियान' २०२४-२५ अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून राबविण्यात येणारी 'प्रधानमंत्री आवास योजना' सर्वात महत्त्वाची घरकुल योजना आहे. कोल्हापूर जिल्ह्यात आज अखेर सन २०१६-१७ ते २०२०-२१ अखेर १६५०५ घरकुले मंजूर झाली आहेत. सन २०२४-२५ या वर्षात ४१६५१ घरे मंजूर करण्यात आली आहेत. ग्रामीण घरकुलांचा तांत्रिक दर्जा उत्तम राहावा, म्हणून ग्रामीण गृह अभियंते नेमण्यात आले आहे. त्यांच्या सेवा जिल्हा परीषदेने सर्व लाभार्थ्यांना उपलब्ध करून द्याव्यात. प्रत्येक घरकुल लाभार्थ्याला महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून ९० दिवसांची मंजुरी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्व मंजूर घरकुले 'मिशन मोड' वर काम करून ३१ मे २०२५ अखेर पूर्ण करून घ्यावीत. रमाई आवास, मोदी आवास, अटल कामगार आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. लाभार्थ्यांना वाळू -खडी - वीट - इतर साहित्य गावातच उपलब्ध होईल. याबाबत जिल्हा परीषदेने विशेष नियोजन करावे अशी सूचना पालकमंत्री, प्रकाश आबिटकर यांनी केली.

## ९८८ मेगावॅट अतिरिक्त क्षमतेची वीज मिळणार

# जिल्ह्याची वीजनिर्मितीच्या स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

**विजय पाठक/ जळगाव**

### सध्याच्या पातळीच्या तुलनेत सुमारे ८२% वाढ

रूफटॉप पॅनेल आणि सौर पंप यासारख्या छोट्या सौर प्रकल्पांमुळे जिल्ह्याच्या एकूण उत्पादन क्षमतेला आणखी चालना मिळते. जळगावमध्ये सध्या १८१ उपकेंद्रे आहेत जी १७९० मेगावॅटपर्यंत हाताळू शकतात. 'वन नेशन वन ग्रीड' उपक्रमांतर्गत, भारताच्या कोणत्याही भागात निर्माण होणारी वीज देशभरात सामायिक केली जाऊ शकते, हे सुनिश्चित करून स्थानिक टंचाई इतर ठिकाणांहून आलेल्या अतिरिक्त रकमेद्वारे भरून काढली जाईल. हे जाळे बळकट करण्यासाठी, आर. डी. एस. एस. योजना सुरू आहेत. यामध्ये सुमारे ८०० नवीन ट्रान्सफॉर्मर बसवणे, अधिक विश्वासार्ह सेवेसाठी कृषी फीडर वेगळे करणे आणि सुमारे ३०० मेगावॅट अतिरिक्त क्षमता जोडण्यासाठी ४३ सबस्टेशन बांधणे किंवा अद्ययावत करणे यांचा समावेश आहे.



### अतिरिक्त ६८२ मेगावॅट वीज उपलब्ध होईल

जळगावमध्ये सरासरी विजेची गरज सुमारे १०७४ मेगावॅट आहे, जेव्हा वातानुकूलन आणि सिंचनाची गरज वाढते तेव्हा उन्हाळ्याच्या महिन्यांत सर्वाधिक मागणी १४०८ मेगावॅटपर्यंत वाढते. येथे नियोजन गृहीत धरणे सोपे आहे. कोणत्याही क्षणी, वापरण्यायोग्य शक्तीचे प्रमाण तीन टप्प्यांपैकी (निर्मिती, पारेषण–वितरण किंवा मागणी) जे सर्वात कमी आहे त्यानुसार निर्धारित केले जाते. नियोजित सुधारणांमुळे वाढीव काळात अतिरीक्त ६८२ मेगावॅट वीज उपलब्ध होईल, ज्यामुळे केवळ स्थानिक गरजाच विश्वासार्हतेने पूर्ण होणार नाहीत, तर जळगाव इतर प्रदेशांना वीज निर्यातही करत राहील.

जळगाव जिल्ह्याची विजेची सरासरी मागणी ही १०७४ मेगावॅटची असून उन्हाळ्यात ही मागणी १४०८ मेगावॅटपर्यंत जाते. आज जरी ही वाढीव मागणी पूर्ण करता येत नसली तरी लवकरच ही मागणी पूर्ण करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाची पावले पडत आहेत. ग्राहकांची मागणी लक्षात घेता औष्णिक ऊर्जा आणि सौरऊर्जा याद्वारे जिल्ह्याला ९८८ मेगावॅट अतिरिक्त क्षमतेची वीज मिळण्याची शक्यता असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून

जळगावमध्ये वीजनिर्मितीचे नेतृत्व दीपनगर भुसावळ येथील औष्णिक ऊर्जा प्रकल्पाद्वारे केले मेगावॅटचे दोन युनिट आणि २१० मेगावॅटचे एक युनिट असे तीन युनिट चालवतो, त्यातून वीजनिर्मिती केली जाते. समाधानाची बाब म्हणजे लवकरच चाचण्या, प्रमाणपत्रे पूर्ण केल्यानंतर मिळवल्यानंतर, ६६० मेगावॅट उत्पादन करण्यास सक्षम असलेले चौथे युनिट सुरू होत आहे. या

ऊर्जेच्या दिशेने लक्षणीय चालना दिली जात आहे. स्थानिक ग्रामपंचायतींनी सौर पार्कसाठी ३९०० एकर जागा वाटप केल्या आहेत, ज्या ९०० मेगावॅटपर्यंत वीजनिर्मिती करू शकतात. सध्या, या सौर क्षमतेपैकी ३२८ मेगावॅटची अंमलबजावणी सुरू आहे, २८ मेगावॅट आधीच कार्यरत आहे, याचा अर्थ असा आहे क्षमता लवकरच उपलब्ध होईल. तथापि, प्रणालीला चोरी आणि पॉवर केबल्सच्या बेकायदेशीर टॅपिंगमुळे आव्हानांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे ४०,००० वितरण ट्रान्सफॉर्मर्सपैकी अंदाजे २०% ओव्हरलोड झाले आहेत आणि ओव्हरलोडमुळे जळून खाक झालेल्या १४०० ट्रान्सफॉर्मर्सची

## हेळवाक वन परिक्षेत्रामध्ये सहा दिवस बंदी

**कराड :** महाराष्ट्र शासनाच्या वनविभाग वनपरिक्षेत्र अधिकारी, सह्याद्री व्याघ्र राखीव, हेळवाक कार्यालयाच्या वतीने हेळवाक वन परीक्षेत्रामध्ये दि.२२ ते २८ फेब्रुवारीपर्यंत सहा दिवस पर्यटकांना प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) च्या मार्गदर्शन अंतर्गत रवि. २३ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत पाऊलखुणा सर्वेक्षण, २६ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत छेद रेषा सर्वेक्षण व प्राणी गणना असल्यामुळे २३ ते २८ फेबुवारी कालावधीमध्ये हेळवाक वनक्षेत्रातील पर्यटन बंद